VOL- VI ISSUE-XII DECEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# शिवकालीन कृषीव्यवस्था

**डॉ. प्रभाकर मिरकड**
इतिहास विभागप्रमुख, मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन

प्राचीनकाळापासून शेती हे भारतीयांचे उपजिवीकेचे साधन राहिले आहे. मध्ययुगामध्ये अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ही कृषी हेच उपजिवीकेचे मुख्य साधन होते. शेतकरी सुखी झाला तरच राज्यसुखी होऊ शकते हे महाराजांचे धोरण होते.कारण छत्रपती शिवाजी महाराज स्वत:ला शेतकऱ्यांचे राजे समजत असत.[१] रयतेच्या सहकार्य आणि पाठिंब्याशिवाय राज्यकारभार शक्य नाही हे महाराज जाणून होते. नव्हे अनेकप्रसंगी महाराजांनी छहे राज्य रयतेचे आहेछ, छहे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहेछ असे उद्गार काढलेले आहेत. तेंव्हा रयतेच्या राज्यात महाराजांचे त्यांच्या विषयीचे अर्थात कृषी विषयक आणि शेतकऱ्यांविषयक काय विचार होते त्याचा उहापोह प्रस्तूत लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दीष्ट्ये :**

१. स्वराज्य स्थापनेपूर्वीचा कृषीविषयक संक्षिप्त आढावा घेणे.
२. शिवकालीन कृषीधोरणाचा आढावा घेणे.
३. वर्तमानकालीन स्थितीत शिवकालीन कृषी धोरणाची गरज स्पष्ट करणे

**गृहीतके :**

१. शेतकऱ्यांचे कल्याण हाच शिवाजी महाराजांच्या राज्याचा मुख्य हेतू होता.
२. शिवकालीन कृषी धोरण विद्यमान स्थितीतही किती प्रभावी आहे याची जाण
३. शिवकालीन कृषी धोरणाची विद्यमान प्रशासनाला जाणीव नाही.
४. स्वराज्य स्थापनेत शेतकऱ्यांचा सहभाग इ ह्याचा उपयोग जगातील अनेकांनी करुन घेतला.
५. संशोधनपध्दत :

केवळ दुय्यम प्रकाशित संदर्भ साहित्य वापरून विश्लेषणात्मक पध्दतीने आणि गृहितकाला अनुसरुन संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.याच अध्ययनातून ऐतिहासिक तथ्ये शोधण्याचा प्रयत्न झाला व काही निष्कर्ष काढण्याचाही प्रयत्न केलेला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला तेव्हांची महाराष्ट्राची शेतकऱ्यांची स्थिती खूपच हालाखीची होती.दरम्यानच्या काळात अनेक दुष्काळ पडलेले होते.आदिलशहा, निजामशहा व मोगलशाहीच्या सरदारांनी महाराष्ट्रातील शेतकरी लूटला होता.अशा काळात अन्यायी सत्तेशी लढा देऊन ज्या स्वराज्याची स्थापना केली गेली त्या स्वराज्याचा पायाच इथला सामान्य शेतकरी वर्ग होता.शेतकरी खचला तर स्वराज्याची निर्मिती शक्य नाही याची वास्तव जाणीव असलेल्या शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष केंद्रीत केले होते. [२]

**शिवकालीन कृषी व्यवस्था**

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतीला नेहमीच अधिक महत्व दिलेले आढळून येते. सभासदाच्या बखरीतील नोंदीनुसार छनवी रयत येई त्यास गुरेढोरे द्यावी, बीजास दानापैका द्यावा, तो ऐवज दोहोचारो वर्षांनी आयुर्थव पाहून उगवून घ्यावा, ये जातीचे रयतेचे पालनग्रहन करावे.छ[३] इथे रयत म्हणजे शेतकरी असून शेती विकासासाठी शेतसाऱ्यात सूट, थकबाकीत सूट, शेती लागवडीखाली आणन्यासाठी प्रोत्साहन देणे, प्रारंभी शेतकऱ्यांना धान्य द्यावे, शेतीसाठी लागणारे जनावरे घेण्यासाठी मदत द्यावी. उत्पन्् वाढल्यावर तो स्थिरस्थावर झाल्यावर दोन-चार वर्षांनी दिलेली मदत परत घ्यावी असे सूचवले आहे.थोडक्यात शेती व्यवसायाला प्रोत्साहन देणे हे अर्थनितीचे मुख्य सूत्र होते.छशेतकऱ्यांच्या विकासासाठी व संपन्नतेसाठी त्यांनी स्विकारलेल्या नीतीमुळे त्यांचा उल्लेख कुणब्यांचा राजा असाही केला जातो.छ[४] शिवाजी राजांच्या परगण्यातील शेती अर्थात पुणे, सुपा प्रांतातील शेती सामान्य होती. हा शेतकरी शेतीला भूमाता

समजत असे.(५) शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक होता. तत्कालीन कागदपत्रावर शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी, गुजारी, रयत असा केलेला आढळतो.यावरुन शिवकाळात शेतकऱ्याला मानाचे स्थान होते.नव्हे शेतकरी हाच स्वराज्याचा कणा व आधारस्तंभ होता.त्याची काळजी किती बारीक-सारीक गोष्टीत सुध्दा शिवरायांनी घेतली होती याचा प्रत्यय महाराजांच्या या आज्ञेवरुन दिसून येतो.च शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही धक्का लागता कामा नये, संध्याकाळी झोपताना तेलवातीचे दिवे विझवून झोपावे, अन्यथा पेटतीवात उंदीर घेऊन गेला तर गवताची गंजी जळून खाक होण्याचा धोका आहे. व त्यामुळे जनावरांना चारा मिळणार नाही.छ(६) अशा सूचना शिवाजी महाराजांनी चिपळूणच्या अधिकाऱ्यांना १९ मे १६७३ रोजी दिल्या होत्या. यावरुन शेतकऱ्यांची किती काळजी महाराज करत होते हे सिध्द होते.विद्यमान स्थितीत राज्यकर्त्यांमध्ये या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे.नव्हे हा गुण राज्यकर्त्यांना पथदर्शकच आहे.महाराजांनी स्वराज्यातील शेतकऱ्यांबरोबरच परमुलखातील रयतेचीही काळजी घेतली होती.युध्दप्रसंगी सैन्यतळा ठिकाणी महाराजांनी आपल्या सैन्याला आणि अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना आपल्याला दिसून येतात. ङ्क्तेथील रयतेला काडीचा आजार द्यावयाची गरज नाही.जाजती केल्यावेगळे सोडणार नाही.हे बरे म्हणून वर्तणूक करणे.छअशा शिवाजी महाराजांच्या स्पष्ट सूचना होत्या.अर्थात शेतकरी स्वराज्यातील असो अथवा परमुलखातील त्याला महाराजांच्या सैन्याकडून कधीही उपद्रव होऊ दिला नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महसूली उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते.तरीही महाराजांनी शेतकऱ्यांना कसलाही त्रास दिला नाही.त्यांच्या ऐपतीप्रमाणे महसूल गोळा केला.प्रत्यक्ष पाहणी निरीक्षणा आधारे महसूल गोळा केला गेला. प्रत्येक बिघ्यामागे २१/५ हिस्सा इतका महसूल निर्धारित करण्यात आला होता.(७) जमीनीची प्रत आणि घेतलेले पीक यांच्याप्रमाणे महसूल कमी जास्त होत असे. गावच्या वसूल निर्धारणाच्यावेळी बहुधा ओसाड व शेती न होण्यासाठीची जमीन वगळण्यात येत असे. महसूल निर्धारणापूर्वी वतनदार गावात व परगण्यात पाहणी आणि तपासणी पथके पाठविली जात असत.(८)

आपले प्रशासन शेतकऱ्यांच्या म्हणजे रयतेच्या सुखसमृध्दीस बांधील असले पाहिजे.आपल्या अधिकाऱ्यांनी रयतेस काडीचाही त्रास देता कामा नये. असा दंडक निर्माण केल्याचे डॉक्टर अ.रा.कुलकर्णी म्हणतात. महाराजांच्या आज्ञापत्रात प्रधानवल्लीच्या सुभेदार रामाजी अनंत यास पाठविलेल्या फर्मानाचा उल्लेख आहे. राज्याभिषेकानंतरच्या (१६७६) फर्मानाचा मजकूर असा होता ङ्क्चोरी न करावी, इमाने-इतबारे साहेब काम करावे, येसी तू क्रियाच (शपथ) केली आहेस. तेणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखवता रास (रास्त) व दुरुस (दुरुस्त) वर्तने। मुलकात बटाईचा तह (अधेलीचा करार) चालत आहे, परंतू रयतेवर जाल (जूलूम) न पडता रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास देई ते करणे. रयतेवरी काडीचे जाल व गैर केलीया साहेब तूजवर राजी नाहीत ऐसे बरे समजणेछ.[९] या फर्मानावरुन स्पष्ट होते की, छत्रपती शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे राजे होते. आजही शेतकरी स्त्रिया ङ्घडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवोङ्‌अशी प्रार्थना करतात. तेंव्हा शेतकऱ्यांना अपेक्षित असणारे बळीचे राज्य महाराजांच्या ङ्घस्वराज्याच्याङ रुपाने महाराष्ट्रात सतराव्या शतकात नांदत होते.त्याचा प्रत्यय येतो.

स्वराज्य स्थापनेपूर्वी महाराष्ट्रात कृषिव्यवसाय उन्नत स्वरूपात नव्हता.खिलजी आणि तुघलक शासकांनी प्रचंड शेतसारा वसूल करुन शेतकऱ्यांचा कणा मोडून काढला होता.छत्रपती शिवाजी महाराजांनी महसूल वसूलीसाठी आपल्या राज्यातील शेतीचा उत्पादकतेनुसार क्रम ठरवला होता.आणि महसूल वसूलीची पूर्वीची प्रथा बंद करुन नवी महसूल रचना निर्माण केली.

०१. राज्यातील सर्व जमीनीची मोजणी करणे व सारा आकारणी
०२. पडीक-नापिक जमीन लागवडीखाली आणने
०३. शेतकऱ्यांचे आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण करणे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सारा वसूलीमधला ङ्घदलालङ हा शब्दच संपवला.शेतकऱ्यांची पिळवणूक करणारा ङ्घजमीनदारङ व्यवस्थेतून नाहिसा केला.आणि कसेल त्याची जमीन लागू केली.हिच कसलेली जमीन त्याची भूमाता समजली जाऊ लागली.प्रारंभिच्या काळात महाराजांनी नापिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी पूढील पाच वर्षासाठी शेतसारा माफ केला होता. एखादया गावातील शेतकरी दुष्काळामूळे गाव सोडून बाहेर गेला असेल तर त्याला परत आणण्यासाठीही उपाययोजना केलेल्या दिसून येतात, त्याला अनेक सवलती दिलेल्या होत्या. जमीन लागवडीखाली कशी येईल यासाठी केलेल्या उपाययोजना अशा होत्या.

०१. शेतकऱ्यांना व्याजरहित कर्ज देणे
०२. सारा भरण्याबाबत सवलत देणे.

०३. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्रास न देणे.
०४. आणि त्यांच्यापासूनकसलीही अपेक्षा न करणे. [१०]

हे सर्व करत असताना सरकारी खजिन्याचा अधिकचा खर्च झाला तरी हरकत नसेल. असेआदेशही महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिलेले होते.प्रभावल्लीच्या सुभेदारास अर्थात रामाजी अनंत सुभेदारास अशा सूचना केल्या होत्या. रयतेपासून सारा वसूल कसा करायचा, वस्तूरुपाने की पैसारुपाने या संबंधी जसा करार झाला असेल तसाच तो करावा. रयत ताकदवान कशी होईल आणि अधिक जमीन लागवडीखाली कशी येईल यासाठी अधिकाऱ्यांनी कष्ट करुन गावचा गाव फिरावेछ. असे महाराज म्हणतात. शेतकऱ्यांचया गरजा समजून घ्याव्यात, त्याला हवी ती मदत करावी या कामासाठी ३ च्जरी दोन लाख लारी (चांदीचे नाणे) पावेतो खर्च करीसील आणि कुणबीया कुणब्याची खबर घेवून त्याला तवानगी (ताकद) येती करुन किर्द (लागवड) करीसील आणि पड जमीन लाऊन दस्त् (महसूल) जाजती करुन देसील तरी साहेबा कबूल असतीलछ. [११]

शेतावर राबणारा शेतकरी सहा महिणे शेती करत असे.उरलेल्या सहा महिण्यासाठी त्याला लष्करात संधी दिली.त्यामुळे त्याला निश्चितच उत्पन्नाची हमी मिळाली. परिणामतः शेतकऱ्याची स्वराज्याबद्दलची निकटता वाढली. शेतकऱ्यासोबतच कारागीरांनाही चरितार्थासाठी जमीनी तोडून दिल्या जात असत.परंतू बहूतेक ठिकाणी त्यांच्या चरितार्थाची जबाबदारी गाव घेत असे. बलूतेदारांनासुगीच्या काळात धान्याच्या रुपात मोबदला दिला जात असे. [१२]

थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील त्यांचे कृषीधोरण आजच्या दृष्टिकोनातून पाहिले तर शेतकऱ्यांबरोबरच सरकारसाठीही योग्यच होते, कारण मोगलकालीन जूलमी कर वसूली पध्दत बंद केली व रयतवारी पध्दत सुरू केली.अनेक गावांचे पुनर्वसन केले. पडिक जमीन लागवडीखाली आणली, दुष्काळग्रस्तांना मदत केली, शेतकऱ्यांसाठी कालवे खोदले, पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली, सुगी संपल्यावर सैन्यात नोकरी देऊन त्यांचा आर्थिक-सामाजिक स्तर उंचावला , परिणामतः शेतकऱ्यांकडे सुबत्ता तर आणलीच पण राज्याच्या तिजोरीतही मोठी भर पडली.

विद्यमान परीस्थितीमध्ये महाराष्ट्रातला शेतकरी अनेक संकटांनी ग्रासला आहे.आर्थिक अस्थिरतेमुळे तो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो आहे त्यामुळे त्याला मदत करणे त्यासाठी सर्वसमावेशक धोरण ठरविणे अत्यंत आवश्यक आहे.त्यासाठी शिवकालातील उपरोक्त धोरणाचा जर अभ्यास केला तर नक्कीच मदत होऊ शकते. शासन शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवित आहे परंतू त्या त्यांच्यापर्यंत पाहोचत नाहीत. आणि त्या राबवताना प्रशासनात आपलेपणा हवा तो विद्यमान काळात शिल्लक नाही हे खेदाने म्हणावे वाटते. म्हणून असे वाटते की, शिवकालीन कृषीव्यवस्था/ धोरण अत्यंत चांगले होते जे आजही आदर्शवत आहे.

## संदर्भ

१. पानसरे गोविंद-शिवाजी कोण होता?लोकवाङमय गृह, मुंबई२०१०- पृ.१५
२. देशमुख श्रीकांत- शिवाजीराजे शेती आणि गावगाडा, दै.सकाळ, १९.०२.१४, - पृ.०८
३. डॉ.काकडे नभा, छत्रपती शिवरायांची अस्सल पत्रे आशय व वैचारिकता चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.प्र.आ.२०११,पृ.११
४. डॉ.काकडे नभा, छत्रपती शिवरायांची अस्सल पत्रे आशय व वैचारिकता चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ.२०११,पृ.९२
५. राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने. खंड २१, पृ.२०३
६. कोकाटे श्रीमंत मुत्सद्दी आणि उदारमतवादी, दै.सकाळ १९.०२.१५, पृ.०४
७. वाकसकर (संपादन) सभासद बखर. पृ.२६
८. राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने. खंड ३०३, पृ.३३०
९. डॉ.पवार जयसिंगराव ( प्रमुख संपादक) छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ग्रंथ म.रा.पा.नि.मंडळ, मुंबई-२५, २०११, पृ.१८
१०. डॉ.पवार जयसिंगराव (प्रमुख संपादक) छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ग्रंथ म.रा.पा.नि.मंडळ, मुंबई -२५, २०११, पृ.१८
११. डॉ.पवार जयसिंगराव (प्रमुख संपादक) छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ग्रंथ म.रा.पा.नि.मंडळ, मुंबई -२५, २०११, पृ.१८
१२. प्रा.मदन मार्डीकर, मराठ्यांचा इतिहास, विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.४०३